**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक ११ जानेवारी २०२५**

**ठळक बातम्या**

1. **केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते सी-डॅकची निर्मिती असलेल्या** ARIES ECO **आणि** ARIES NOVA **डेव्हलपमेंट बोर्डस चे अनावरण.**
2. **अपघात ग्रस्त व्यक्तींना मदत करणाऱ्यासाठी प्रोत्साहन रक्कम 5000 रुपये वरून 25 हजार रुपये करू - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची रस्ते सुरक्षा कार्यक्रमात माहिती**.
3. **नागपुरातील मेडिकल आणि मेयो रुग्णालयाच्या कामाचा घेतला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आढावा.**
4. **सर्व कलांचे ज्ञानपीठ असल्याने विद्यापीठात चित्रपट महोत्सवाचे आयोजन स्तुत्य - नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.प्रशान्त बोकारे यांचे नागपूर फिल्म फेस्टिवल मध्ये प्रतिपादन.**

**अश्विनी वैष्णव**

केंद्रीय रेल्वे, माहिती आणि प्रसारण, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते पुण्यातील पाषाण येथील सी-डॅक संकुलात व्हेगा प्रोसेसर चिपवर आधारित आधारित SoC ASIC आणि DIR V व्हेगा प्रोसेसर आधारित दोन डेव्हलपमेंट बोर्डचे अनावरण झाले. ARIES ECO आणि ARIES NOVA डेव्हलपमेंट बोर्ड ही दोन्ही उत्पादने सी डॅक ने डिझाईन आणि विकसित केली आहेत. ARIES ECO हे उत्पादन विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असून सेन्सर फ्यूजन, स्मार्ट मीटर आणि वेअरेबल डिव्हाइसेस यांसारख्या ॲप्लिकेशन्ससह प्रयोग करण्यासाठी ते एक सहजसाध्य व्यासपीठ उपलब्ध करून देते. मोठ्या यांत्रिक किंवा इलेक्ट्रॉनिक प्रणालीमध्ये कार्य करणाऱ्या एम्बेडेड संगणक प्रणालीच्या, वेगाने विकसित होत असलेल्या क्षेत्रात, ARIES NOVA शिक्षण, संशोधन आणि विकासासाठी एक व्यासपीठ प्रदान करते. THEJAS64 हे पहिले पूर्णपणे स्वदेशी 64-बिट व्हेगा आधारित सिस्टम-ऑन-चिप उत्पादन असून त्याची रचना मजबूत आणि सुरक्षित एम्बेडेड ॲप्लिकेशन्ससाठी केली आहे.

सी डॅक ने आयोजित केलेल्या प्रदर्शनालाही केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी भेट दिली तसेच सी डॅकचे शास्त्रज्ञ आणि अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक घेतली. 2047 सालापर्यंत भारत विकसित देश होण्यासाठी संगणकीय आणि तंत्रज्ञानाचा विकास हा मुख्य पाया आहे आणि सी डॅकची त्यात अतिशय महत्वाची भूमिका आहे, असे वैष्णव यांनी यावेळी सांगितले.

**रस्ते सुरक्षा-गडकरी-अनुपम खेर**

रस्ते अपघात झाल्यानंतरच्या 'गोल्डन अवर' मध्ये अपघातग्रस्तांचे प्राण वाचणे आवश्यक असते यामुळे अपघातग्रस्तांना मदत करणाऱ्या व्यक्तींना सरकारतर्फे 5 हजार रुपये दिले जातात या रकमेमध्ये वाढ करून ती 25 हजार रुपये करण्यात येईल अशी माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज दिली. नागपूरच्या वनामती सभागृहामध्ये आयोजित रस्ते सुरक्षा कार्यक्रमांतर्गत प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेते अनुपम

खेर यांना मुलाखत देताना गडकरी बोलत होते. अपघातग्रस्त व्यक्तींना मदत करणाऱ्या लोकांना पोलीस किंवा प्रादेशिक परिवहन अधिकारी कुठलेही प्रश्न विचारत नाहीत उलट या व्यक्तींना 5 हजार रुपये प्रोत्साहन म्हणून दिले जातात .या रकमेमध्ये आपण वाढ करणार असल्याचे सांगून संसदेने या अपघात ग्रस्त व्यक्तींना मदत करणाऱ्यांसाठी 'गुड सेमेरीटन ऍक्ट' पारित केला असल्याची माहिती गडकरी यांनी दिली.

***कि जैसे अब एक्सीडेंट होगा और उसको पुलिस अपने रिकॉर्ड में नोंद करेगी, वो कंप्यूटर पे ही वेबसाइट पर ही आएगा । और एफआयआर दर्ज करके रिकॉर्ड तैयार हो जाएगा तो 7 दिन का खर्चा मिनिमम डेढ़ लाख रुपए का खर्चा वो हम तुरंत उस हॉस्पिटल को देंगे, ये भी हमने किया है । बाद में उसके इन्शुरन्स के पैसे भी है। डेथ होने के बाद वो भी मिलते है और पूरे सिस्टम में जो लॅप्सेस थे वो दूर करके हम उसको ट्रान्सपरंट, टाइम बाउंड और कम्प्यूटराइज्ड कर रहे है।***

समाजातील स्वयंसेवी संस्था तसेच समाजसेवक यांनी रस्ते सुरक्षा संदर्भात पुढाकार घेऊन काम करावे असं आवाहन त्यांनी केले. रस्ते सुरक्षा क्षेत्रात काम करणाऱ्या राजू मानकर आणि चंद्रशेखर मोहिते यांचे त्यांनी विशेष कौतुक केले.

आपल्या देशामध्ये 10 हजार विद्यार्थी हे शाळेच्या आजूबाजूच्या सदोष ट्रॅफिक व्यवस्था तसेच चौकाची रचना यामुळे अपघाताला बळी पडतात 30 हजार व्यक्ती बिना हेल्मेट मुळे दगावतात अशी माहिती गडकरींनी दिली. नागपूरच्या अजनी मध्ये 25 वर्षांपूर्वी खूप अपघात होत असत परंतु या चौकातील रस्ते अभियांत्रिकीच्या माध्यमातून सुधारणा केल्यामुळे आता 25 वर्षात येथे एकही अपघात झाला नाही असे त्यांनी सांगितले. नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक हर्ष पोतदार तसेच रोडमार्क या संस्थेने अपघात प्रवण स्थळ दुरुस्त केले असून नागपूर ग्रामीणमध्ये राष्ट्रीय महामार्गावर अपघातांची संख्या 48% नी कमी झाली असल्याची माहिती त्यांनी दिली. राष्ट्रीय युवा दिन मोदी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या राष्ट्रीय युवा दिनानिमित्त दिल्लीत भारत मंडपम् इथं तीन हजार युवा नेत्यांशी संवाद साधणार आहेत. स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय युवा दिन साजरा केला जातो. विकसित भारतासाठी एक लाख तरुणांना राजकारणात सहभागी करून त्यांना राष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध करून देणं हा या संवादाचा उद्देश आहे. यावेळी तंत्रज्ञान, शाश्वतता, महिला सक्षमीकरण, उत्पादन आणि शेती यासारख्या विषयांवर दहा उत्कृष्ट निबंधांच्या पुस्तकाचं प्रकाशन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे.

**मुख्यमंत्री फडणवीस/मेयो-मेडिकल**

नागपुरातील इंदिरा गांधी शासकीय वैदयकीय महाविद्यालय आणि रुग्णालय आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय येथील कामाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आढावा आणि पाहणी केल्यानंतर ते प्रसार माध्यमांशी बोलत होते. मेयो रुग्णालयात सध्या सुमारे ६२५ कोटी रुपयांच्या ५०० खाटांचे रुग्णालय, नर्सिंग कॉलेज, नर्सिंग हॉस्टेल, पदव्यूत्तर विद्यार्थ्यांचे वसतिगृह, मुलांचे वसतिगृह, विविध स्टोअर्स, धर्मशाळासह इतरही एकूम ३४ विविध प्रकल्पांवर काम सुरू आहे.

*दोन्ही ठिकाणी काम चाललेली आहेत कामे प्रगतीपथावर आहेत पण त्याची गती वाढवण्याची आवश्यकता आहे. काही छोटया मोठया त्रुटी त्याच्यामध्ये आहे ते दूर करण्याची आवश्यकता आहे. त्यासंदर्भात एक आढावा घेतलेला आहे.निधीचे कुठे कमतरता या ठिकाणी नाही किंवा पडणार नाही त्यामुळे वेळेत ही सगळी काम आणि चांगल्या क्वालिटीचे झाली पाहिजे कुठेही क्वालिटीमध्ये कॉम्प्रमाइज होऊ नये ही दोन्ही जी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि इस्पितळे आहे ही एखाद्या चांगल्या खासगी रुग्णालयापेक्षा किंवा मेडिकल कॉलेजपेक्षादेखील चांगल्या दर्जाची आपल्याला बनवता आली पाहिजे तसा आमचा प्रयत्न आहे त्यादृष्टीने हा सगळा आढावा घेतलेला आहे.*

दरम्यान महाविकास आघाडी मध्ये तणाव असल्याबद्दल त्यांना प्रश्न विचारला असता आघाडी राहील की तुटेल याकडे आमचं लक्ष नाही, महाराष्ट्राला प्रगतीकडे नेण्याचा आमचा प्रयत्न आहे. असं ते म्हणाले.

**वाईल्डकॉन-2025**

संरक्षित क्षेत्रांच्या बाहेर स्थानिक पातळीवरील वन्यप्राण्यांच्या मुबलक संख्येवर नियंत्रणासाठी अभिनव आणि संवेदनशील उपाययोजना' या विषयावर भारतातील पहिली परिषद चंद्रपुरात नुकतीच संपन्न झाली. केंद्र सरकार आणि विविध राज्यातील अनेक तज्ज्ञांनी या संवेदनशील विषयावर येथे चिंतन आाणि मंथन केलं. चंद्रपूर येथे तत्ज्ञांच्या निष्कर्षातून निघालेल्या सकारात्मक उपाययोजनेतूनच मानव - वन्यजीव संघर्ष कमी करण्याचा मार्ग निघेल, असा विश्वास राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी व्यक्त केला. वन अकादमी येथे 'वाईल्डकॉन - 2025' या दोन दिवसीय परिषदेचा समारोप करतांना ते बोलत होते.

**रामलल्ला प्राणप्रतिष्ठा**

अयोध्येत रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेला एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त आजपासून तीन दिवसांचा विशेष कार्यक्रम सुरू होत आहे. गेल्या वर्षी २२ जानेवारी रोजी प्राणप्रतिष्ठा झाली होती, परंतु तिथीनुसार आजपासून हा उत्सव साजरा केला जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज अयोध्येत रामलल्लांच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त सर्व देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**राज्यमंत्री प्रतापराव जाधव**

केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज बुलढाणा जिल्ह्यात जिल्ह्यातील शेगाव तालुक्यात पहूरजिरा, कालवड, कठोरा, गोंडगाव पहूरपूर्णा आदिसह गावांमध्ये अचानक नागरिकांचे केस गळती होऊन टक्कल पडत असलेल्या गावांना भेटी दिल्या. पुढे बोलताना केंद्रीय मंत्री .प्रतापराव जाधव म्हणाले

*सगळी यंत्रणा याच्यावरती लक्ष ठेवून आहे. उद्या दिल्लीचे आणि चेन्नई मद्रासहुन सुद्धा आपण डॉक्टर लोकं याचे निदान करण्यासाठी नेमका हे कशामुळे होतो आहे हे कळले पाहिजे आणि का होतो हे जर कळलं तर त्यावर योग्य ते उपचार आपल्याकडे सगळे आहेत याची आपण बरेचसे पाण्यामुळे होईल असं वाटत होतं. म्हणून आपण या सगळ्या*

***गावचे पाण्याचे नमुने पाठवले पण तसे पाण्याचे नमुने मध्ये काही असं ज्याच्यामुळे केस गळतील असे काही घटक त्याच्यात आढळलेले नाही.***

यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक आणि सर्व प्रशासनाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

**नागपूर फिल्म फेस्टिवल**

विद्यापीठाच्या नावातच विद्या म्हणजे ज्ञान आहे. सर्व कलांचे ज्ञानपीठ असल्याने विद्यापीठात चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले, असे प्रतिपादन प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि नागपूर चलचित्र फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'नागपूर फिल्म फेस्टिवल' चे आयोजन करण्यात आले आहे. चित्रपट महोत्सवानिमित्त निर्माण करण्यात आलेल्या चलचित्र नगरी (प्रदर्शनी)चे उद्घाटन आज कुलगुरू डॉ.प्रशान्त बोकारे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी ते मार्गदर्शन करीत होते. प्रास्ताविक करताना आयोजन समितीचे सदस्य जय गाला यांनी नागपूर फिल्म फेस्टिवल आयोजित करण्यामागील भूमिका सांगितली. या चित्रपट महोत्सवामध्ये एकूण ३५० चित्रपटांची नोंदणी झाली आहे. त्यातील १३८ चित्रपट नागपूर, १७८ विदर्भातून अशा एकूण ६५ शहरातून तसेच २२ भाषांमधून चित्रपट प्राप्त झाल्याची माहिती त्यांनी दिली.

**शैक्षणिक साहित्य संमेलन**

नूतन भारत विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय, विदर्भ साहित्य संघ, नागपूर महानगरपालिका शिक्षण विभाग नागपूर, कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय राज्यस्तरीय मराठी भाषाप्रेमी शैक्षणिक साहित्य संमेलनाचे रविवार, 12 जानेवारी रोजी उद्घाटन होत आहे. कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशीमबाग येथे सायं. 6 वाजता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होणार असून मराठी सिने कलावंत अंकुश चौधरी यांची विशेष उपस्थितीत हा कार्यक्रम होईल.

ग्रंथ दिंडीने प्रारंभ होत असलेल्या संमेलनाचे अध्यक्षपद अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.रविंद्र शोभणे भूषविणार आहे.

*****